# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

## पोस्ट - शिर्डी - 423 109

## तालुका-राहाता, जिल्हा-अहमदनगर (महाराष्ट्र)

दुरध्वनी क्रमांक- (०२४२३)२५८८४४, २५८८२३,२५८८२७ फॅक्स क्रमांक-२५८८७०
वेबसाईट - http://www.saibabasansthan.org.in or sai.org.in
Email ID :- saiprasadalaya@sai.org.in



# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) चे श्री साई प्रसादालयात अन्नपाकीटे (नाष्टापाकीटे) बनवून देणे विषयी ई-निविदा.

## सन २०१८ - २०१९

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

## अन्नपाकीटे (नाष्टापाकीटे) तयार करणेकामी ई-निविदा

## ❖ अनुक्रमणिका ❖

सन-२०१८-२०१९ (एका वर्षासाठी)


| अ.नं. | तपशील | पान नंबर |
|---|---|---|
| १. | अनुक्रमणिका | ०२ |
| २. | श्री साई प्रसादालयाची माहीती | ०३ |
| ३. | कामाचा तपशिल | ०४ |
| ४. | निविदेच्या अटी व शर्ती | ०५ ते १३ |
| ५. | अधिकार प्रदान पत्र व निविदाधारक माहीती | १४ ते १५ |
| ६. | निविदाधारक यांचे हमीपत्र | १६ |
| ७. | **टेक्नीकल बीडसोबत ऑनलाईन स्कॅन करुन द्यावयाची माहिती (पान क्रं.१३ मुद्दा क्रं.६३ अं.नं.१ ते ७ )** | **पान क्रं.१३ मुद्दा क्रं.६३** |

# **श्री साई प्रसादालयाची माहिती**

श्री साईंचे दर्शनासाठी राज्यातून, देशातून, परदेशातून अनेक साईभक्त येत असतात, त्यातील बरेच साईभक्त प्रसादभोजन घेण्यासाठी येतात.

श्री साई प्रसादालयाची उभारणी ०२ हेक्टर ८५ आर एवढया मोठया जागेत करणेत आलेली असून, "श्री साई प्रसादालय" ही वास्तू दि.०८ जानेवारी २००९ पासून भक्तांच्या सेवेसाठी खुले करणेत आलेली आहेत. श्री साई प्रसादालयात दररोज साधारणत: अंदाजे ४५,००० ते ५०,००० साईभक्त प्रसादभोजनाचा लाभ घेतात. गर्दीमध्ये (श्रींचे तीनही उत्सव, रामनवमी, गुरुपौर्णिमा, दसरा तसेच नाताळ, दिपावली सुट्टया, सलग सुट्टया) दररोज अंदाजे ६०,००० ते ८७,००० पर्यंत साईभक्त प्रसादभोजनाचा लाभ घेतात.

श्री साई प्रसादालयाचे कामकाजाची वेळ सकाळी ७ ते ३ व दुपारी ३ ते रात्रौ ११ अशी असून प्रसादालय साफ सफाईची कामे ही तीनही (७ ते ३, ३ ते ११ व ११ ते ७) शिफ्टमध्ये चालतात. प्रसादभोजनामध्ये भक्तांना दोन भाजी, चपाती, भात, डाळ आणि एक गोड पदार्थ असे भोजन देण्यात येते.

श्री साई प्रसादालयामध्ये अनेक प्रकारच्या मशिनरींचा वापर करणेत येत असून त्यांचा वापर करुन प्रसादभोजन बनविणेत येत आहेत. त्याचप्रमाणे पहाटे ३ ते सकाळी १०.०० वाजेपर्यंत भक्तांना अल्पोपहार म्हणून अन्नपाकीटे तयार करण्यात येतात. अन्नपाकीटामध्ये सुकी भाजी, पुरी व बर्फी देण्यात येते. गर्दीचे प्रमाणात दररोज अंदाजे १०,००० ते १५,००० अन्नपाकीटांची विक्री करण्यात येते.

श्री साई प्रसादालयास फुड सेफ्टीचे ISO 22000-2005 चे नामांकन मिळालेले असून, श्रींचे प्रसादालयाचे नाव हे जगविख्यात झालेले आहे. प्रसादालयाचे किचन हे मेगा किचन म्हणून संबोधले जात असून त्या स्वरुपाची माहीती नॅशनल जिओग्राफी या टिव्ही चॅनलवर दाखविण्यात आलेली आहे.

एकंदरीत श्री साई प्रसादालयास जगविख्यात मिळालेली प्रसिध्दी, फुड सेफ्टीचे ISO 22000-2005 चे नामांकन त्याचप्रमाणे दररोज मोठया प्रमाणात प्रसादभोजन घेत असलेली भक्त संख्या यादृष्टीने सदरहु निविदेत नमूद केल्याप्रमाणे कामगार लावणे, त्यांना शासनाचे किमान वेतन ॲक्टप्रमाणे वेतन देणे, प्रॉ.फंड भरणे, संस्थान नियमानूसार कामगारांची विमा पॉलिसी काढणे, दिपावली सानुग्रह अनुदान देणे, गणवेष व बुट पुरविणे. इत्यादी सर्व बाबींचा विचार करुनच निविदाधारक कंपनीने निविदा भरावयाची आहे. त्यामुळे प्रसादालयातील अन्नपाकीटे (नाष्टापाकीटे) तयार करणेची कामे उत्कृष्ट होणे गरजेचे आहे. करीता सदरहु कामासाठी इकडील विभागामार्फत ई-निविदा प्रक्रिया राबविणेत येत आहेत. त्यामुळे या सर्व बाबींचा विचार करुनच निविदाधारकाने निविदा भरावी.

# ❖ प्रसादालयातील कामाचे (ई-निविदाचे) स्वरुप ❖

## <u>कामाचा तपशील</u>

ई-निविदा भरतांना खालील मार्गदर्शन पर मुद्यांचा विचार करुन बीड ऑफ क्वांटिटी (BOQ) ई-निविदा भरावी.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या वतीने साईभक्तांसाठी सकाळी ६ ते १० या वेळेत श्री साईबाबा भक्तनिवासस्थान, व्दारावती भक्तनिवासस्थान, साईआश्रम नं.०१, साईआश्रम नं.०२, साईनाथ मंगल कार्यालय, साईबाबा हॉस्पीटल, साईनाथ हॉस्पीटल इत्यादी ठिकाणी अन्नपाकीटे (नाष्टापाकीटे) विक्री करणेत येतात.

सदरहु ई-निविदा ही अन्नपाकीटामधील अन्नपदार्थ तयार करुन पिशवीत पॅकींग करुन देण्याचे काम ठेकेदारामार्फत करण्यात येते. ठेकेदारास अन्नपाकीटे तयार करणेकामी लागणारा कच्चा माल उदा. किराणा साहीत्य, गहु आटा, गोडतेल, कडधान्य, मसाले, पाणी, वीज, पॅकींग पिशवी, वगैरे इत्यादी साहीत्य संस्थानकडून पुरविण्यात येईल. तयार अन्नपाकीटे विक्री करण्याचे काम संस्थानचे वतीने नेमून दिलेल्या विभागामार्फत करण्यात येईल. अन्नपाकीटे तयार करुन पॅकींग करणेची कामे संस्थानचे वरिष्ठ अधिका-यांमार्फत व मार्गदर्शनाखाली करावी लागणार आहेत.

दररोज साधारणत: १२,००० ते १५,००० अन्नपाकीटांची आवश्यकता असून गर्दीचे प्रमाणात यामध्ये वाढ अपेक्षीत आहे. त्यादृष्टीने गर्दीचे प्रमाणात कामगार लावून अन्नपाकीटे तयार करुन पुरविणे बंधनकारक आहे. तसेच परिसरातील नैसर्गिक आपत्कालीन परिस्थितीमध्ये उदा.भुकंप, महापूर वगैर अशा स्वरुपाची परिस्थती निर्माण झाल्यास त्यावेळी देखील अन्नपाकीटे तयार करुन पुरवावे लागतील. यासर्व बाबींची दखल व हिशोब करुनच निविदाधारक यांनी निविदा भरावयाची आहे.

या सर्व बाबी विचारात घेवून निविदाधारक यांनी प्राईस बीडमध्ये दर **(BOQ)** देतांना जी.एस.टी वगळून द्यावयाचा आहे.

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी)**

**श्री साई प्रसादालय विभागात अन्नपाकीटे (नाष्टापाकीटे) तयार करणेकामी शर्ती व अटी**

१. अन्नपाकीटे निविदा ऑनलाईन भरावयाची आहे.

२. सदरचे कामासाठी असलेली बयाणा रक्कम रु.१,१०,०००/- (अक्षरी रु.एक लाख दहा हजार मात्र) व टेंडर फी रु.११,०००/-(अक्षरी रु.अकरा हजार मात्र) महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर ऑनलाईन निविदा फी व बयाणा रक्कम थेट जमा करावी.

३. बयाणा रक्कमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज देण्यात येणार नाही. विना बयाणा रक्कमेची निविदा नामंजूर करणेत येईल.

४. निविदाधारकांनी दरपत्रक सादर करताना जीएसटी वगळून दर सादर करावेत. जीएसटीचे दर वेळोवेळी शासनाचे नियमानूसार लागू करण्यात येतील. जी.एस.टीची रक्कम संस्थानकडून आदा करण्यात येईल.

५. सन २०१५-२०१६, २०१६-२०१७, २०१७-२०१८ या तीन आर्थिक वर्षातील सरासरी वार्षिक उलाढाल किमान रु.१० लाख असणे बंधनकारक राहील. त्यापेक्षा कमी उलाढाल असल्यास निविदाधारकास अपात्र ठरविण्यात येईल.

६. निविदेसोबत स्कॅन करावयाची कागदपत्रे, नमुने, व इतर अटी/शर्तीचा तपशिल सोबत दिलेला आहे. त्यानूसार पुर्ण माहीतीत भरलेली व स्कॅन करणेत आलेली निविदा सादर करावयाची जबाबदारी निविदाधारकांवर आहे.

७. कमी-जास्त दराची कुठलीही निविदा स्विकारणेचा अथवा नाकारणेचा अधिकार संस्थान व्यवस्थापनाने राखून ठेवला आहे. त्याबद्दलची कारणे देणे संस्थान व्यवस्थापनावर बंधनकारक राहणार नाही.

८. निविदेसोबत स्कॅन करुन जोडलेल्या तांत्रिक कागदपत्रांचाच (Technical Bid) विचार करणेत येईल.

९. सदर निविदेची बयाणा रक्कम, निविदा किंमत व कामाचा कालावधी खालीलप्रमाणे राहील.

| अ.नं. | कामाचे स्वरुप | बयाणा रक्कम | निविदा किंमत | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १. | अन्नपाकीट (नाष्टापाकीटे) तयार करणे. | १,१०,०००/- (अक्षरी रु.एक लाख दहा हजार मात्र) | ११,०००/- (अक्षरी रु.अकरा हजार मात्र) | ०१ वर्षे |

१०. उपरोक्त ई-निविदेसोबत फक्त Online Upload (स्कॅन केलेले) केलेल्या कागदपत्रांचाच विचार करणेत येईल. Hard Copy मध्ये कुठलीही कागदपत्रे स्विकारणेत येणार नाहीत.

११. ई-निविदा कळविलेल्या तारखेस व वेळेत सादर करावयाची जबाबदारी निविदाधारकाची राहील.

१२. अन्नपाकीटे (नाष्टापाकीटे) बनविणे कामी लागणारे साहीत्य उदा. कच्चा मला, गहुआटा, मैदा, तेल, इंधन, लाटणे, पोळपाट, मशिनरी वगैरे संस्थान मार्फत पुरविण्यात येईल.

१३. कंत्राटदारास कोरडा आटा मळून अंदाजे प्रत्येकी २५ ग्रॅम वजनाच्या ०५ नग पु-या लाटून तळणे, सुकी भाजी/उसळ, तयार करुन पिशवीत भरणे, बर्फी/शिरा बनविणे हे सर्व पदार्थ ठरलेल्या परिमाणानूसार (सुमारे २५ ग्रॅम वजनाच्या ५ पु-या, १२५ ग्रॅम भाजी व २५ ग्रॅम वजनाची बर्फी वडी किंवा शिरा) पेपर पिशवीमध्ये भरुन बंद पाकीट तयार करुन द्यावे लागेल.

१४. अन्नपाकीटामध्ये पुरी देणे बंधनकारक राहील. मात्र प्रसादालय अधीक्षक, पर्यवेक्षक सांगतील त्याचवेळी अन्नपाकीटामध्ये चपाती द्यावी लागेल.

१५. श्रींचे श्री रामनवमी, गुरुपौर्णिमा व दसरा या तिनहीत उत्सवामध्ये कर्मचा-यांना द्यावयाची बुंदी व चिवडा पाकीटे तसेच दिपावली रवा-लाडू प्रसाद पाकीटे प्रसादालय अधीक्षक, पर्यवेक्षक सांगतील त्याप्रमाणे अंदाजे ८ ते १० हजार पाकीटे भरुन पॅकींग करुन देणे बंधनकारक राहील.

१६. उपरोक्त कामासाठी लावलेल्या कर्मचा-यांचे एकवेळचे भोजन व चहाची व्यवस्था संस्थान तर्फे विनामुल्य केली जाईल. मात्र निवास व्यवस्था कंत्राटदाराने स्वत: स्वखर्चाने करावयाची आहे.

१७. वरील अन्न पाकीटे (नाष्टापाकीटे) तयार करणेकामी लागणारा कच्चा माल व इंधन संस्थान तर्फे पुरविण्यात येईल. कच्च्या मालाची आवश्यकतेनुसार उपभांडारमधून वाहतुक कंत्राटदारास स्वत:चे कामगाराकडून करावी लागेल. उपभांडारमध्ये माल शिल्लक नसल्यास सदरचा माल मुख्य भांडार येथून संस्थान वाहनाने कंत्राटदारास स्वत:चे कामगाराकडून करावी लागेल.

१८. कोणत्याही प्रकारे अन्नपाकीटातील पदार्थ खराब झाल्यास त्याची नुकसान भरपाई कंत्राटदारास भरुन द्यावी लागेल. तसेच आपल्या कर्मचा-यांकडून मालाची नासधुस झाल्यास त्याची नुकसान भरपाईची जबाबदारी कंत्राटदारावर राहील.

१९. श्री साई प्रसादालय अधिक्षक, पर्यवेक्षक, लिपीक, मुकादम यांनी ठरवून दिलेल्या प्रमाणात व वेळेत अन्नपाकीटे (नाष्टा पाकीट) तयार करुन पुरवावे लागतील.

२०. उपरोक्त कामी लावलेल्या कामगारांचे कामावर देखरेख, नियंत्रण विशेषत: स्वच्छता (केस, नखे) तसेच कामाचे ठिकाणी धुम्रपान/मद्यपान/तत्सम पदार्थांचे सेवण केले जाणार नाही याची काळजी कंत्राटदाराने घ्यावयाची आहे.

२१. कंत्राटदाराने कामगांराना स्वच्छ ऍप्रन,कॅप, हॅण्डग्लोज व मास्क पुरविणे बंधनकारक आहे. मात्र गणवेषामध्ये सुसूत्रीतपणा, पॅटर्न, रंग एकसारखा असावा म्हणून संस्थान ठरवील त्याप्रमाणे कापडाचे गणवेष तयार करावे लागतील त्यासाठी येणारा खर्च कंत्राटदाराने करावयाचा आहे.

२२. अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य यांचे नियमांमध्ये वेळोवेळी होणारे बदल (रुल्स ऍण्ड रेग्युलेशन) कंत्राटदारास मान्य राहतील व त्यांचे निर्देशानूसार स्वच्छतेची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

२३. या कामासाठी लावणेत येणा-या कंत्राटी कामगारांचे बाबतीत कामगार नुकसान भरपाई कायदा १९२३ (वर्कमन कॉम्पेन्सेशन ऍक्ट १९२३) नुसार कंत्राटी कामगारास नुकसान भरपाई द्यावयाची झाल्यास सदरचे नुकसान भरपाईची रक्कम, भविष्य निर्वाह निधी अधिनियम १९५२ (प्राव्हीडंड फंड ऍक्ट १९५२) नुसार भरावी लागणारी अंशदानाची रक्कम प्रशासकीय चार्जेससह तसेच किमान वेतन अधिनियम १९४८ नुसार द्यावे लागणारे किमान वेतन दर तसेच पेमेंट ऑफ वेजेस ऍक्ट १९३६ नुसार कंत्राटी कामगारांना विहीत मुदतीत वेतन आदा करणे. इत्यादीची

कायदेशीर जबाबदारी तसेच त्यानुसार करावी लागणारी पुर्तता करण्याची कायदेशीर जबाबदारी ही कंत्राटदारावर बंधनकारक राहील. त्याची तोषिश संस्थानला लागता कामा नये.

२४. भविष्य निर्वाह निधी अधिनीयम १९५२ नुसार आवश्यक कागदपत्रांची तपशिलवार माहितीसोबत परिशिष्ट-अ प्रमाणे आहे.

२५. या कामासाठी लावणेत येणा-या कामगारांची वैद्यकिय तपासणी संस्थानमार्फत संस्थानचे रुग्णालयात निशुल्क करणेत येईल. संस्थानने ठरवून दिलेल्या वेळेत वैद्यकिय तपासणी करुन घेण्याची जबाबदारी कंत्राटदारावर राहील.

२६. या कामासाठी लावणेत येणा-या कंत्राटी कामगारासंबंधी कंत्राटी कामगार (नियम व निर्मुलन) अधिनियम १९७० नुसार ठेवावे लागणारे हजेरी रजिस्टर, वेतन रजिस्टर व इतर संबंधीत सर्व रेकॉर्ड व दस्तऐवज विहीत नमुन्यात ठेवण्याची व त्यासंबंधी सर्व कायदेशीर पुर्तता करण्याची जबाबदारी कंत्राटदारावर राहील.

२७. याकामासाठी लावणेत येणा-या कंत्राटी कामगारांचे गणवेष,ओळखपत्र, कामगारांचा विमा व्यवसायकर,कामगार कल्याण निधी, आयकर, टीडीएस, जीएसटी ,उपदानांची रक्कम,सानुग्रह अनुदान अथवा बोनस, वर्कमेन कॉम्पेनसेशन पॉलीसी, पगारी रजा व सुटटया, घरभाडे भत्ता, ई.एस.आय.सी, इत्यादी बाबत सर्व कायदेशीर पुर्तता करणेची जबाबदारी कंत्राटदारावर बंधनकारक राहील.

२८. या कामासाठी लावणेत येणा-या कंत्राटी कामगार (नियम व निर्मुलन) अधिनियम १९७० व महाराष्ट्र कंत्राटी कामगार (नियम व निर्मुलन) नियम १९७१ व तसेच सर्व कामगार कायद्याचे पालन करणे व त्यानूसार आवश्यक ते रेकॉर्ड, दस्त ऐवज ठेवणे, संबंधीत ऍथॉरिटीला नियमानूसार विवरणपत्रे पाठविणे त्यासंबंधी वेळोवेळी कायदेशीर पुर्तता करणे इ.संपूर्ण जबाबदारी कंत्राटदारावर बंधनकारक राहील.

२९. कत्राटी कामगार (नियम व निर्मुलन) अधिनियम १९७० चे नियम २१(१) नूसार मा.सहाय्यक कामगार आयुक्त, अहमदनगर यांचे कडून लेबर लायसेन्स व केटरींग परवाना घेऊन त्याची प्रत संस्थानचे निविदा फॉर्म भरलेनंतर त्यासोबत जोडणे बंधनकारक राहील.

३०. सदर काम उक्ते टेंडर पध्दतीचे असल्याने सदरचे कामासाठी कॉन्ट्रॅक्टरकडून लावलेले कामगार व त्यांचे अन्य सेवक संस्थान सेवेकरीता आग्रह धरु शकणार नाहीत. तसेच कंत्राटदाराने लावलेल्या कंत्राटी कामगारांचा संस्थानशी कोठल्याही प्रकारे मालक-नोकर असा कायदेशीर संबंध राहणार नाही.

३१. कंत्राटदाराचे कोणतेही कामगार हे संस्थानचे कामगार असणार नाहीत. कंत्राटदार व त्यांचे कामगार यांच्यात काही वाद उपस्थित झाल्यास तो कंत्राटदाराने सोडवावयाचा आहे. त्याची कोणतीही जबाबदारी संस्थानवर असणार नाही.

३२. ज्या निविदाधारकाची निविदा मान्य करण्यात येईल त्यास संस्थानकडे एकूण वार्षिक कामाच्या रकमेच्या ३% रक्कम सुरक्षा अनामत (Security Deposit) म्हणून ठेवावी लागेल. सदर रक्कम संस्थानने कळविलेनंतर त्वरीत भरणे बंधनकारक राहील. त्यावर कोणतेही व्याज मिळणार नाही.

३३. कार्यादेश दिल्यानंतर १५ दिवसांचे आत करारनामा रु.६००/- च्या गैरन्यायिक स्टॅम्प पेपरवर करारनामा करुन दयावा लागेल. करारनामा करुन दिला नाही अथवा टाळाटाळ केल्यास कार्यादेश रद्द करणेचा अधिकार संस्थानने राखून ठेवला आहे.

३४. सदर कामाचे कॉन्ट्रॅक्ट दिल्यानंतर, सदर कॉन्ट्रॅक्टरने उप कॉन्ट्रॅक्टरास काम देणेत येऊ नये, असे आढळल्यास सदर कॉन्ट्रॅक्ट रदद करणेत येईल.

३५. कंत्राटदारास संस्थानला तिन महिने पूर्वसुचना न देता काम बंद करता येणार नाही. पर्वूसूचना न देता कंत्राटदाराने काम बंद केलेस /संस्थानला भक्तांना सेवा पुरविणेस अडचणी निर्माण झाल्यास कंत्राटदाराचे कंत्राट रदद करुन त्याची अनामत रक्कम संस्थानखाती जमा करण्यात येईल तसेच कंत्राटदाराचे नाव काळया यादी (Black List) टाकण्यात येईल त्याबाबत कंत्राटदारास तक्रार करता येणार नाही.

३६. या कामासाठी लावलेल्या कामगारास अपघात झाल्यास त्या अपघाताची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदारावर राहील. संबंधीत कामगारास संस्थानकडून मोफत वैद्यकिय मदत/आर्थिक सहाय्य (नुकसान भरपाई) मागण्याचा अधिकार राहणार नाही. सबंधीत कंत्राटदाराने कामगारांचा रु.१० लाख रकमेचा अपघाती विमा उतरविणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील.

३७. अन्नपाकीटाची व अन्नपाकीटातील पदार्थांची प्रत (क्वालिटी) समाधानकारक नसल्याचे आढळून आल्यास महिन्याचे एकूण बिलापोटी ५% पर्यंत दंडात्मक कारवाई करणेत येईल. तसेच कर्मचाऱ्यांचे पगार, दिवाळी बोनस, पी.एफ व जी.एस.टी बाबत वारंवार तक्रारी आल्यास कंत्राट रद्द करणेत येवून याकामी कोणतीही आगावू नोटीस न देता काळया यादीत टाकणेत येईल.

३८. <u>साईभक्तांसाठी दर्रोज सरासरी १२,००० ते १५,००० अन्नपाकीटे बनवावे लागतात. गर्दीमध्ये वाढ झाल्यास गर्दीचे प्रमाणात जास्त अन्नपाकीटे बनविणे गरजेचे असल्यामुळे निविदेसोबत अनुभवाचे दाखले म्हणून यापूर्वी मोठया प्रमाणात केलेल्या व करीत असलेल्या कामाबाबत त्या मालकांच्या/संस्थेच्या कार्यादेशाच्या प्रमाणीत प्रती सोबत जोडणे आवश्यक आहे</u>.

३९. अन्नपाकीटे तयार करतांना चांगल्या प्रकारची स्वच्छता, कामाची गती वाढविणे व आरोग्याला उपकारक पध्दती वापरणेसाठी ॲटोमॅटीक मशिनरी घेणे संस्थानचे विचाराधीन आहे. मशिनरी खरेदी केल्यामुळे कंत्राटदाराचे काही प्रमाणात अथवा पुर्णतः काम बंद झाल्यास त्याबाबत कंत्राटदारास आक्षेप घेता येणार नाही.

४०. कॉन्ट्रॅक्ट मुदतीत अन्नपाकीटे तयार करणेकामी मशिनरीज उपलब्ध झाल्यानंतर सध्याचे कॉन्ट्रॅक्ट रद्द करण्याचा अधिकार संस्थानने राखून ठेवलेला आहे व त्यापुढील कालावधीसाठी नविन दर ठरविणेसाठी विहीत पध्दतीचा अवलंब करण्यात येईल.

४१. अन्नपाकीटे बनवून देणाऱ्या कंत्राटदाराने त्याकामी घेतलेल्या कामगारांना टेंडरमधील अटी/शर्ती मध्ये नमूद केलेल्या सर्व कायदेशीर बाबी उदा. किमान वेतन, प्रॉव्हीडंड फंड, सानुग्रह अनुदान, गणवेष, ओळखपत्र,वैद्यकिय मदत वगैरेची पुर्तता करणे व पालन करणे हे कंत्राटदारावर बंधनकारक आहे.

४२. दरपत्रक भरतांना टेंडरकालावधीत किमान वेतन ऍक्टनूसार वेतन आदा करण्यासाठी सदर कालावधीत वेळोवेळी वेतन दरात होणारी वाढ विचारात घेणे, दिपावलीचे वेळी सानुग्रह अनुदान देणेसाठी रकमेची तरतुद करणे, प्रॉव्हीडंड फंड, (मालकाचा हिस्सा) याची तरतुद करणे गरजेचे आहे. एकदा अन्नपाकीटाचे (नाष्टापाकीटाचे) दर मान्य झाल्यानंतर वरील कामासाठी कंत्राटदाराची कोणत्याही प्रकारची अडचण/तक्रार ऐकून घेतली जाणार नाही.

१. प्रत्येक कर्मचाऱ्यास किमान वेतनाप्रमाणे वेतन आदा करणे.
२. प्रत्येक कर्मचाऱ्याचे नावाने प्रॉ.फंड जमा करणे
३. प्रॉ.फंडाचे यादीत प्रत्यक्ष कामासाठी असलेल्या कर्मचाऱ्याशिवाय इतरांचे नावाचा समावेश नसावा.
४. कर्मचा-यास ८ तासापेक्षा जास्त काम देण्यात येऊ नये. अपवादात्मक बाब म्हणून जादा वेळ काम द्यावे लागल्यास त्याचा वेगळा मोबदला त्या कर्मचाऱ्यास देणे गरजेचे आहे.
५. प्रत्येक कर्मचाऱ्याचा रु.१० लाख रकमेचा अपघाती विमा उतरविणे गरजेचे आहे.
६. कर्मचा-यांना एकूण वार्षिक वेतनाच्या ८.३३% एवढे सानुग्रह अनुदान द्यावे लागेल.

४३. कंत्राटदाराने स्वत:चे कामगारांना दरमहाचे १० तारखेच्या आत बँक अकौंट पध्दतीने मजुरी रक्कम आदा करणे कंत्राटदारावर बंधनकारक आहे. तसेच संस्थानकडून काही कारणास्तव बीलाची रक्कम आदा करणेस वेळ लागल्यास कंत्राटदाराने बीलाची रक्कम मिळणेची वाट न पाहता कर्मचा-यांचे वेतन दरमहा १० तारखेच्या आत द्यावयाचे आहे. त्याकामी जीएसटी, प्रॉ.फंडाची रक्कम दरमहा ०५ तारखेच्या आत शासनाकडे जमा करुन बील प्रसादालयामध्ये सादर करावे.

४४. गर्दीचे प्रमाणात अन्नपाकीटे तयार करुन देण्याची जबाबदारी कंत्राटदारावर राहील. गरजेप्रमाणे अन्नपाकीटे तयार करुन देण्यास कंत्राटदार असमर्थ ठरल्यास दुसऱ्या कंत्राटदाराकडून अन्नपाकीटे तयार करुन घ्यावी लागल्यास त्याकामी येणारा वाढीव खर्च मुळ कंत्राटदाराकडून वसूल करण्याचा अधिकार संस्थानला राहील किंवा गर्दीचा अंदाज न घेता अनावश्यक अन्नपाकीटे तयार करुन दिल्यामुळे जादा प्रमाणात शिल्लक राहुन संस्थानचे नुकसान झाल्यास होणारे नुकसान कंत्राटदाराचे बीलातून/सुरक्षा अनामत रकमेतून वसूल करण्यात येईल.

४५. अन्न सुरक्षा मानके कायदा-२००६ आणि नियम-२०११ व ISO-22000-2005 चे नियमानूसार ठेकेदार यांनी अन्नपाकीटे बनविणेकामी असणारे स्त्री कामगार यांना डयुटी वेळेत गळयातील मंगळसूत्र सोडून इतर अलंकार, हातातील बांगडया, अंगठी, नेलपेंट तसेच पुरुष कामगारांनी हातात कडे/धागे/अंगठी वगैरे वस्तू वापरणेवर प्रतिबंध राहील.

४६. अन्न सुरक्षा मानके कायदा-2006 आणि नियम-2011 व ISO-22000-2005 चे नियमानूसार अन्नपाकीटे बनविणेकामी असणाऱ्या कामगारांनी वेळेचे वेळी केस कापणे, दाढी करणे,कटींग करणे,नखे कापणे इ.बंधनकारक राहील तसेच अन्नपाकीटे किचन येथे निविदाधारक यांनी त्यांचेकडील कामगारांना, किचनमध्ये वापरणेसाठी स्लीपर/रबरी चप्पल/गमबुट स्वखर्चाने द्यावे लागेल.

४७. अन्नपाकीटे बनविणेकामी एक किंवा अनेक ठेकेदारांची नियुक्ती करणेचा अधिकार संस्थानने राखून ठेवलेला आहे.

४८. अन्नपाकीटे बनविणेकामी लागणारे किरकोळ साहित्य उदा.कौचे, झारे, तेल काढणेकामी स्टे.स्टील मग वगैरे साहित्य निविदाधारक यांनी स्वखर्चाने आणून वापरावयाचे आहे. तसेच संस्थानने अन्नपाकीटे बनविणेकामी दिलेली भांडी, कढई, ट्रे, क्रेटस् इ.साहित्य वेळचे वेळी घासून स्वच्छ/साफ करावे लागतील.

४९. कमी/जास्त दराची कोणतीही निविदा स्वीकारणेचा अथवा नाकारणेचा अधिकार संस्थान व्यवस्थापनाने राखुन ठेवलेला आहे. त्याबाबतची कारणे देणे संस्थानवर बंधनकारक राहणारनाही.

५०. संस्थानने अन्नपाकीटे (नाष्टापाकीटे) बनविणेकामी दिलेले भरलेल्या तेलाचे डबे रिकामे झालेनंतर त्यामधील तेल संपुर्णत: निथळून घेवून, डब्यातील संपूण तेल काढून संस्थानने ठरवून दिलेल्या जागेवर रचून ठेवावे. तसे न झाल्यास दंडात्मक कारवाई करणेत येईल.

५१. कॉन्ट्रॅक्टदारास सर्व कंत्राटी कामगारांना वेळोवेळी लागु होणा-या किमान वेतन दराप्रमाणे वेतन द्यावे लागेल.

५२. कॉन्ट्रॅक्टरने सदर कालावधीत सर्व कंत्राटी कामगारांना त्यांच्या एकूण वार्षिक वेतनाचे रकमेवर ८.३३% या प्रमाणे सानुग्रह अनुदान रक्कम व्यवस्थापन समितीचे निर्णयास/आदेशास अधिन राहुन दिपावलीचे सणाचे अगोदर अदा करावी.

५३. कंत्राटी कामगारांची नेमणूक करताना, त्यांच्या वयोमानाची खात्री करणेकामी, कागदपत्रे उदा.जन्म तारखेचा दाखला नोकरी अर्जासोबत जमा करुन घ्यावा.

५४. कॉन्ट्रॅक्टदारामार्फत नेमणूक केलेल्या कर्मचा-यांचे आगमन निर्गमनावर नियंत्रण ठेवणेकरीता कर्मचारी ज्या ठिकाणी काम करतात त्या परिसरात बायोमेट्रीक प्रणाली आपले मार्फत बसविण्यात यावी, तसेच सदर कर्मचा-यांना आगमन निर्गमनाच्या वेळी तसेच डयुटीच्या मध्यंतरी नियमित व वेळेवर थम पंचिंग करणेस आवश्यक आहे. आगमन-निर्गमनाचे दोन वेळेस व डयुटी सुरु झाल्यानंतर चार तासांनी म्हणजे डयुटीच्या मध्यांतरी नियमित थम पंचिंग करावे, त्यांचे पंचिंग रिपोर्ट दुस-या दिवशी संस्थानचे कामगार विभागाकडे जमा करावे, जे कर्मचारी थम पंचिंग करणार नाहीत व कामावर उशिरा येतील अशा कर्मचा-यांचे वेतनातून संस्थान नियमानूसार कपात करण्यात येईल.

५५. **भविष्यात जी.एस.टी दरात वाढ किंवा घट झाल्यास त्यानूसार नोटीफिकेशनच्या दिनांकापासून वाढ किंवा घट करणेत येईल.**

५६. दरमहा रक्कम भरणा केलेनंतर चलनाची एक मुळ प्रत, ऑनलाईन प्रॉ.फंड रजिस्टर, रक्कम जमा केलेचे रिमिटन्स स्लीप, हजेरी पत्रक व पगारपत्रक इत्यादी कागदपत्रांच्या प्रमाणीत प्रती (प्रत्येक महिन्याची स्वतंत्रपणे) सादर कराव्या लागतील.

५७. **काढून टाकणे**

क) संबंधित विभाग प्रमुख निविदाधारकाचे नांव संस्थानचे यादीतून काढून टाकण्यासाठी सक्षम राहतील, जर निविदाधारक -

ख) एखादा करार कार्यान्वित करण्यास अपयशी ठरल्यास किंवा तो समाधानकारकरित्या कार्यान्वित करण्यास अपयशी ठरल्यास;

ग) कर्मचा-यांची देणी वेळेवर अदा न केल्यास

घ) संस्थानचे अदा केलेली GST रक्कम विहीत वेळेत शासनाकडे भरणा न केल्यास.

५८. ई-निविदा मधील अटी शर्तीचा व कागद पत्रांचा अभ्यास करुन ई-निविदा सादर करावी. ई-निविदे संबंधी काही शंका असेल तर त्यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे कार्यालयात दूरध्वनी क्र.-(०२४२३) २५८८४४ /२५८८२३ /२५८८२७ वर संपर्क करावा.

५९. सदर कामाचे कॉन्ट्रॅक्ट दिल्यानंतर कंपनीचे कॉन्ट्रॅक्ट मुदत संपल्यानंतर ताब्यात दिलेले डेडस्टॉक साहीत्य कमी आढळल्यास त्याची भरपाई रक्कम अंतिम बीलातून किंवा अनामत रक्कमेतून कपात केली जाईल.

६०. या कॉन्ट्रॅक्टबाबत काही वाद उपस्थित झाल्यास कोर्ट कारवाई करणे भाग पडल्यास उभय पक्षकारांना सदरचा वाद हा मा.सिव्हील जज्ज ज्युनियर डिव्हीजन, राहाता कोर्ट, मा.सिव्हील जज्ज सिनियर डिव्हीजन, कोपरगांव कोर्ट, मा.जिल्हा व सत्र न्यायालय, कोपरगांव, मा.उच्च न्यायालय, ,मुंबई, खंडपीठ औरंगाबाद, या न्यायालयाचे अधिकार कक्षेत उपस्थित करता येईल. अन्य कोर्टात वाद दाखल करता येणार नाही.

६१. कार्यादेशात नमुद केल्याप्रमाणे संस्थानचे आवश्यकते नुसार वेळोवेळी गर्दीचे जादा कर्मचारी कामास लावून अन्नपाकीटे पुरवावी लागेल.

६२. **कर्मचारी भविष्य निर्वाह निधी अधिनियम-१९५२ नुसार कंत्राटदाराने खालील बाबींची/ कागदपत्रांची पुर्तता करणे बंधनकारक आहे.**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी आस्थापनेस एम्प्लॉईज प्रॉव्हीडंट फंड ऍक्ट १९५२ लागू असलेने श्री साईबाबा संस्थान यांचे कडील कॉन्ट्रॅक्टर्स मार्फत नेमलेल्या कामगारांना देखील प्रॉ.फंड ऍक्ट-१९५२ लागू होतो. त्यामुळे आपण संस्थानकडील कामाकरीता नेमलेले कामगारांचे पगारपत्रकानूसार होणारी भविष्य निर्वाह निधीची रक्कम दरमहा वेळेत भरणा करुन आवश्यक ती कागदपत्रे जमा करणे ही कंत्राटदाराची कायदेशीर जबाबदारी आहे.

१. आपणास स्वत:चा प्रॉव्हिडंट फंडाचा कोड नंबर असणे आवश्यक असून प्रॉव्हीडंट फंडाचे कोड नंबर असलेबाबत पुरावा म्हणून पी.एफ कोड ड्राप्ट लेटरची सत्य प्रत टेंडर सोबत जोडावी लागेल.

२. कामाचे सुरवातीस कंत्राटी कामगार (नियम व निर्मुलन) अधिनियम १९७० चे नियम २१(१) नूसार मा.सहाय्यक कामगार आयुक्त अहमदनगर यांचे कडून या कामाकरीता घेतलेले लेबर लायसन्सची प्रत अथवा त्याबाबतचे प्रतिज्ञापत्राची प्रत वरील संस्थान कामाकरीता घेतलेले लेबर लायसन्स मधील कर्मचारी संख्येपेक्षा कमी कर्मचारी कामास नेमले असतील तर प्रत्यक्षात किती कामगार नेमले याबाबतचे दरमहा पत्र द्यावे लागेल.

३. आपण सदर कामाकरीता नेमलेल्या कर्मचाऱ्यांचे भविष्य निर्वाह निधी कार्यालयाकडील विहीत नमुन्यातील वारसदार फॉर्म भरुन घेवून सदर फॉर्म भविष्य निर्वाह निधी कार्यालयाकडे जमा करणेची जबाबदारी आपली राहील.

४. दरमहा रक्कम भरणा केलेनंतर चलनाची एक मुळ प्रत, ऑनलाईन प्रॉ.फंड रजिस्टर, रक्कम जमा केलेचे रिमिटन्स स्लीप, हजेरी पत्रक व पगारपत्रक इत्यादी कागदपत्रांच्या प्रमाणीत प्रती (प्रत्येक महिन्याची स्वतंत्रपणे) सादर कराव्या लागतील.

५. आपणास प्रसादालय विभागाने काम दिलेले असलेने त्यांचे अहवालावरुन कामाचा कालावधी निश्चीत करण्यात येईल. व त्या कालावधीची उपरोक्त कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

६. काम सुरु झालेनंतर महिना संपलेनंतर दुस-या महिन्याचे १५ तारखेच्या आत प्रॉ.फंडाची रक्कम भरणा करुन साधारणत: २० ते २५ तारखेला दरमहा उपरोक्त कागदपत्रे सादर करावी लागतील.

७. आपले विविध ठिकाणी कामे चालू असतील व या कामाची भविष्य निर्वाह निधीची रक्कम एकत्रीत चलन भरणा केलेली असेल तर साईटवार रक्कम भरलेचा तपशिलवार तक्ता दरमहा उपरोक्त कागदपत्रांसोबत सादर करावा लागेल.

८. प्रत्येक महिन्याचे बीलावर, मागील महिन्यातील भविष्य निर्वाह निधीची रक्कम भरणा केलेबाबत शेरा देण्यात येतो. रक्कम भरुन कागदपत्रे सादर केलेशिवाय शेरा देता येत नाही. कागदपत्रे वेळेत सादर न केलेस आपले बील वेळेत आदा होत नाही.

९. उपरोक्त प्रमाणे आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करणेस कंत्राटदारास विलंब झाल्यामूळे सदर कामाचे बील प्रलंबीत राहिलेस त्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदारावर राहील.

१०.संस्थानकडील कंत्राट संपलेनंतर आपले कडील कामगारांची भविष्य निर्वाह निधीची रक्कम त्यांना परत मिळवून देणे संबधित कार्यवाही करणेची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

६३. **ई-निविदेच्या ऑनलाईन टेक्नीकल बीडसोबत खालीलप्रमाणे कागदपत्रे स्कॅन करुन विहीत मुदतीत अपलोड करावीत.**

१. कंत्राटी कामगार (नियम व निर्मुलन) अधिनियम १९७० चे नियम २१(१) नूसार मा.सहाय्यक कामगार आयुक्त, यांचे कडून लेबर लायसन नंबर व Valid असल्याची छायांकित प्रत.

२. अन्न औषध प्रशासन, यांचेकडील केटरींग फुड परवाना व Valid असल्याची तारीख.

३. प्राव्हीडंड फंड कोड नंबरची छायांकित प्रत.

४. पॅन कार्डची छायांकित प्रत.

५. सन २०१५-२०१६, २०१६-२०१७ व २०१७-२०१८ या तीन आर्थिक वर्षातील सरासरी वार्षिक उलाढाल रु.१० लाख पर्यंत किंवा त्यापेक्षा जास्त उलाढालीचे सनदी लेखापालाने दिलेले प्रमाणपत्र.

६. जी.एस.टी रजिस्ट्रेशन नंबरची छायांकित प्रत.

७. कामाचे अनुभवाचे दाखले

श्री साईबाबांचे शुभाशीर्वादासह,

(श्रीमती रुबल अग्रवाल, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.

# अधिकार प्रदान पत्र

- **कंपनीचे नांव** :-
- **कंपनी रजिस्ट्रेशन नंबर** :-
- **कंपनीचा कायमचा पत्रव्यववहार पत्ता** :-
- **फोन नंबर/ मोबाईल नंबर** :-
- **ई-मेल आय डी** :-

**अधिकार प्रदान करणा-या कंपनी अधिका-याचे/मालकाचे नांव** :-

**अधिकारी पदान करण्यात आलेल्या व्यक्तीचे नांव व हुद्दा** :-

मी खालील सही करणार श्री ------------------------------------------------------------------ असे घोषित करतो की मी / माझ्या कंपनीने संस्थानचे प्रसादालयाकरीता अन्नपाकीटे तयार करणेच्या कामाकरीता संस्थान नियमाप्रमाणे ई-निविदा प्रक्रियेत सन २०१८-१९ या वर्षासाठी भाग घेतला आहे. त्यात माझी निविदा मंजूर झाल्यास संस्थानशी पत्रव्यवहार व ई-निविदेसंबंधीत/कामासंदर्भात कार्यवाही करणेकरीता मी माझ्या/ कंपनीच्या वतीने श्री ------------------------------------------------------- वय - वर्षे पदनाम ------------------- यांना उपरोक्त कामा संबंधी माझ्या वतीने / कंपनीच्या वतीने संस्थानशी करारनामा करणे, कार्यादेश, नोटीसा घेणे व त्याअनुषंगिक कामे करण्यासाठी सदरहु कामाची निविदा / कार्यादेशाचा कालावधी समाप्त होईपावेतो अधिकार प्रदान करीत आहेत.

या अधिकार प्रदान पत्रानंतर संबंधीत व्यक्तीने माझ्या / कंपनीच्या वतीने केलेले कोणतेही कृत्य, पत्रव्यवहार, आर्थिक व्यवहार हा माझ्या / माझ्या कंपनीचा व्यवहार असेल. अशी या प्रपत्राव्दारे मी / आम्ही घोषित करतो व श्री ------------------------------------------------------------ यांना कंपनीचे वतीने अधिकार प्रदान करतो.

| | | |
|---|---|---|
| **कंपनीचे/मालकाचे नांव व सही** | | **अधिकार देण्यात आलेल्या** |
| **अधिकार प्रदान करणा-या** | **शिक्का** | **व्यक्तीचे नांव व सही** |

**(सदर प्रपत्र कंपनीचे लेटरहेडवर भरुन विहीतह मुदतीत अपलोड करावेत.)**

# परिशिष्ट - 'अ'

**श्री साई प्रसादालय**

**अन्नपाकीटे (नाष्टापाकीटे) तयार करणेकामी ई-निविदा**

**(सदरची माहीती भरुन निविदाधारकाने टेक्नीकल बीडसोबत स्कॅन करुन जोडावयाची आहे.)**

## निविदाधारकाची माहीती

1) निविदा धारकाचे नांव - -------------------------------------------------------

2) पत्रव्यव्यवहारासाठी पूर्ण पत्ता - -------------------------------------------------------

3) फोन क्रमांक - -------------------------------------------------------

कार्यालय - -------------------------------------------------------

निवास - -------------------------------------------------------

फॅक्स नंबर - -------------------------------------------------------

मोबाईल नंबर - -------------------------------------------------------

ई-मेल - -------------------------------------------------------

4) संपर्कासाठी अधिका-याचे नांव - -------------------------------------------------------

फोन क्रमांक - -------------------------------------------------------

5) मालकाचे/भागीदारांची नांवे - 1) -------------------------------------------------------

2) -------------------------------------------------------

6) ठेकदारीचा नोंदणी क्रमांक - -------------------------------------------------------

7) सध्याचे लेबर लायसन्स नंबर - -------------------------------------------------------

8) प्राव्हीडंड फंड कोड नंबर - -------------------------------------------------------

9) जी.एस.टी नंबर - -------------------------------------------------------

10) व्यवसाय कर नोंदणी नंबर - -------------------------------------------------------

11) कर्मचा-यांची एकूण संख्या - -------------------------------------------------------

12) आयकर पॅन नंबर - -------------------------------------------------------

13) बँक खाते नंबर - ------------------------------------------------

आय.एफ.सी कोड - ------------------------------------------------

निविदाधारकाची सही व शिक्का

(कार्यालयीन कामकाजा कारीता)

# परिशिष्ट - 'ब'

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिरडीकरीता निविदाधारकाने द्यावयाचे पत्र.**

**(ई-निविदाधारकाने सदरचे पत्र स्वत:चे लेटरहेडवर तयार करुन टेक्नीकल बीडसोबत जोडावयाचे आहे.)**

दिनांक :- / /२०१८

प्रति,
मा.मुख्य कार्यकारी अधिकारी मॅडम,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिरडी
यांसी,

**विषय :- अन्नपाकीटे (नाष्टापाकीटे) तयार करुन देणे बाबत...**

महोदय,

खालील सही करणार मी /आम्ही कळवितो की, आपण वृत्तपत्रात वरील विषयाबाबत प्रसिध्द केलेली निविदा सुचना वाचली. आपल्या ऑनलाईन ई-निविदेत नमूद केलेल्या सर्व अटी व शर्ती मी/आम्ही वाचल्या असून त्या मला/आम्हाला मान्य आहेत. आपल्या सर्व अटी-शर्तीचे पालन करावयाचे मी/आम्ही मान्य करीत आहे/आहोत.

मी/आम्ही आपणांस निविदेमध्ये नमूद केल्याप्रमाणे अन्नपाकीटे (नाष्टापाकीटे) प्रमाणीत आकाराचे/वजनाचे आवश्यकते नुसार सर्व प्रक्रीयासह तयार करुन देण्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी स्विकारण्याची हमी मी/आम्ही देत आहोत. सदर कामासाठी लावण्यात येणा-या कामगारांचे हजेरी रजिस्टर पगारपत्रक, पी.एफ कागदपत्रे वगैरे संबंधित रेकॉर्ड विहीत नमुन्यात ठेवून त्यांचा भविष्य निर्वाह निधी ऍक्ट १९५२ नुसार करावयाची पुर्तता तसेच इतर अनुषंगिक सर्व कायदेशीर पूर्तता त्याचप्रमाणे जी.एस.टी भरणेची सर्वस्वी जबाबदारी माझेवर / आमचेवर राहील.

मी/आम्ही आमची निविदा मंजूर झाल्यास रु.६००/- चे गैरन्यायिक स्टॅम्प पेपरवर करारनामा करुन देवू. तसेच कामाच्या एकूण वार्षिक रकमेच्या ३% प्रमाणे रक्कम सुरक्षा अनामत रक्कम म्हणून जमा करण्याची हमी घेत आहोत. सदर रकमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही याची आम्हाला पुर्ण कल्पना आहे. उपरोक्त काम एक वर्ष अखेर तथा निविदेतील अटी/शर्ती नूसारचे कालावधीपर्यंत करणे माझेवर/आम्हावर बंधनकारक राहील.

**आपला / आपले विश्वासू**

**शिक्का**

**सही / सहया**